Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

Original Article

# दुष्काळ निवारणार्थ आटपाडी पाणी परिषदेचा लढा

**डॉ. विजय विष्णू पाडळकर[1],रमेश रामचंद्र वायदंडे[2]**
[1]मार्गदर्शक,एम. ए. पीएच.डी चं.शा. शेंडूरे कॉलेज हुपरी ता. हातकणंगले जि.कोल्हापूर
[2]संशोधक विद्यार्थी,पीएच.डी. , इतिहास अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
**Email**-rameshwaydande123@ gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170922
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 9(A)
Pp.109-112
September 2025

**Submitted:**23 Aug. 2025
**Revised:** 4 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***सारांश***

*सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील पाणी समस्येच्या निराकरणासाठी आटपाडी पाणी परिषद ही एक ऐतिहासिक जनचळवळ ठरली. या परिषदेची स्थापना ११ जुलै १९९३ रोजी क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली झाली. परिषदेतून कृष्णा खोऱ्यातील पाण्याचे न्याय्य वाटप, जलसिंचन प्रकल्पांना गती, आणि दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या पाणी हक्कासाठी सतत लढा दिला गेला.*

*या परिषदांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष पाणी समस्यांकडे वेधले गेले, तसेच टेंभू, म्हैसाळ, ताकारी, नीरा-देवधर अशा योजनांना गती मिळाली. आटपाडी पाणी परिषद ही केवळ पाण्यासाठीची लढाई नसून ग्रामीण जनतेच्या सामाजिक, आर्थिक आणि कृषी पुनरुत्थानाची दिशा देणारी चळवळ ठरली.*

***मुख्यशब्द:*** *आटपाडी पाणी परिषद, दुष्काळग्रस्त भाग, कृष्णा खोरे, नागनाथ अण्णा नायकवडी, जलसिंचन योजना, टेंभू योजना, म्हैसाळ योजना, जनआंदोलन, पाणी समस्या, सांगली जिल्हा, ग्रामीण विकास.*

**प्रस्तावना :-**

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागातून दक्षिण सातारा जिल्हा तयार करण्यात आला. या जिल्ह्यात जत औंध कुरुंदवाड मिरज आणि सांगली या संस्थानिकाच्या अधिपत्याखालील गावांचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर २१ नोव्हेंबर १९६०रोजी दक्षिण सातारा जिल्ह्याचे नाव बदलून सांगली असे ठेवण्यात आले. सन १९६५ मध्ये सांगली जिल्ह्यात कवठेमहांकाळ आणि आटपाडी हे दोन नवीन तालुके निर्माण झाले. कालांतराने या जिल्ह्यात पलूस आणि कडेगाव या दोन तालुक्यांची ही भर पडली. आज सांगली जिल्ह्यात दहा तालुके अस्तित्वात आहेत. महाराष्ट्राच्या जडणघडणीत सांगली जिल्ह्याने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. अशा या महत्वपूर्ण जिल्ह्यात दुष्काळ निवारणार्थ मोठ्या प्रमाणात जन आंदोलने झाली आहेत. दुष्काळग्रस्त तालुक्यामधील जनतेच्या पाणी समस्या सोडविण्यासाठी आटपाडी पाणी परिषद ही कृष्णा खोऱ्यातील एक महत्वपूर्ण मंच आहे. विशेषतः ही परिषद आटपाडी खानापूर तासगाव कवठेमंकाळ आणि जत अशा १३ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी लढा देते.

**१.आटपाडी पाणी परिषदेचा उद्देश : -**

- कृष्णा खोऱ्यातील हक्काचे पाणी मिळवण्यासाठी जनतेचे लक्ष वेधणे.
- शेतकऱ्यांच्या पाणी समस्या विषयी सरकारचे लक्ष वेधून घेणे.
- जलसिंचन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि पाणी संवर्धनाकरिता पाठपुरावा करणे
- दुष्काळी भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

DOI:
10.5281/zenodo.17510740
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*रमेश रामचंद्र वायदंडे, संशोधक विद्यार्थी पीएच.डी. , इतिहास अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर*

**How to cite this article:**
*पाडळकर, . विजय . विष्णू ., & वायदंडे, . रमेश . रामचंद्र . (2025). दुष्काळ निवारणार्थ आटपाडी पाणी परिषदेचा लढा. Journal of Research and Development, 17(9(A)), 109–112. https://doi.org/10.5281/zenodo.17510740*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**२. आटपाडी पाणी परिषदेचे महत्त्व : -**

- ही परिषद शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्याचे प्रतीक आहे.
- पाणी समस्या बाबत या परिषदेमुळे जनजागृती झाली आहे.
- शेतकऱ्यांची पाणी समस्या सोडवण्यासाठी या परिषदेमुळे सरकारवर दबाव आणता आला.

**३. आटपाडी पाणी परिषद : -**

सांगली जिल्ह्याची नैसर्गिक रित्या तीन भागात विभागणी केली जाते. एक भरपूर पर्जन्याचा दुर्गम शिराळा, दोन सुपीक कृष्णा नदी काठावरील वाळवा, पलूस, सांगली आणि मिरज आणि तिसरा कायम पर्जन्यछायेच्या प्रदेशातील आटपाडी, खानापूर, कडेगाव, कवठेमंकाळ आणि जत या तालुक्यांचा समावेश होतो, या तालुक्यातील लोकांना कायमस्वरूपी दुष्काळाशी सामना करावा लागत होता. या भागातील जमीन सिंचनाखाली आणण्याची लोकांची प्रभावी इच्छा होती. पण तत्कालीन महाराष्ट्र सरकारने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे नाइलाजास्तव या भागातील जनतेने आपल्या सरकार विरोधात जन आंदोलने करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी दुष्काळग्रस्त भागातील लोकांनी एकत्र येऊन पाणी परिषद भरवून महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा पक्का निर्धार केला. अशा प्रकारे दुष्काळग्रस्त आणि लोकांना पाणी मिळावे, यासाठी २३ सप्टेंबर १९७३रोजी मिरजेची पाणी परिषद, २८ एप्रिल १९८३ रोजी भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखालील मुक्ती संघर्ष चळवळ आणि ११जुलै १९९३रोजी आटपाडी पाणी परिषद भरवून क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी सरकारचे लक्ष वेधून घेतले होते.[१] अशा प्रकारे या प्रस्तुत लेखात आटपाडी पाणी परिषदेचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**१.आटपाडीची पहिली पाणी परिषद (११ जुलै १९९३) –**

बच्छावत आयोगाच्या अहवालातील शिफारशी अन्वये कृष्णा खोऱ्यातील ५९४ टी.एम.सी. पाणी महाराष्ट्राला मिळणार होते. ते पाणी अडवून राज्याला ३१ मे २००० पर्यंत दिले जावे असे त्या अहवालात नमूद करण्यात आले होते. या पाण्यापैकी आपल्याला जास्तीत जास्त पाणी मिळावे अशी अपेक्षा अपेक्षित राहिलेल्या दुष्काळग्रस्त आटपाडी, खानापूर, कवठेमंकाळ आणि जत तालुक्यातील लोकांना वाटत होती. या पाणी समस्या संदर्भात मे १९९३ मध्ये आटपाडी गावातील कार्यकर्त्यांनी एक बैठक घेतली होती. या बैठकीला खानापूर परिसरातील दुष्काळग्रस्त लोकांच्या समस्या संदर्भात लढणारे मुक्ती संघर्ष चळवळीचे प्रमुख नेते डॉ. भारत पाटणकर यांना आमंत्रित केले होते. या बैठकीतून डॉक्टर भारत पाटणकर यांनी पाणी समस्येविषयी मेळावे घेण्याची आणि या मेळाव्याला नागनाथ अण्णा नायकवडी यांना येण्याची विनंती केली होती. यानुसार आटपाडी या ठिकाणी ११ जुलै १९९३ रोजी पहिली आटपाडी पाणी परिषद भवानी हायस्कूलच्या क्रीडांगणामध्ये पार पडली.[२] या परिषदेत सुमारे ४०,००० शेतकरी, कष्टकरी, मजूर, महिला आणि युवक सहभागी झाले. या परिषदेला लोकांचा मोठ्या प्रमाणात उदंड प्रतिसाद मिळाला. या परिषदेत काही ठराव पास करण्यात आले. कृष्णा नदीचे पाणी अडवून त्याचे समान व न्याय पद्धतीने वाटप झालेच पाहिजे. कृष्णेचे पाणी न्याय हक्काने दुष्काळी भागातील लोकांना मिळाले पाहिजे. शासनाने दुष्काळग्रस्त भागाला जलद गतीने पाणी कसे देता येईल याचा विचार करावा. अशा प्रकारच्या मागण्या ठरावांमुळे मान्य करण्यात आल्या .या आटपाडी पाणी परिषदेतून नागनाथ अण्णांनी ही चळवळ यशस्वी करण्यासाठी एक घोषणा करून टाकली. दुष्काळी भागाला कृष्णेच्या पाण्याचे समान व न्याय वाटप होईपर्यंत दरवर्षी राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या २६ जुलै या जन्मदिवशी आटपाडीत पाणी परिषद घेण्याचा निर्धार व्यक्त केला.[३] मात्र सध्या २६जून हा जन्मदिवस आटपाडी पाणी परिषद दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच परिषदेत तेरा दुष्काळी तालुक्यांना समाविष्ट करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या चळवळीमध्ये आटपाडी खानापूर तासगाव कवठेमंकाळ जत या तालुक्यासोबत सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी सांगोला, मंगळवेढा, माढा आणि सातारा जिल्ह्यातील खटाव, माण, खंडाळा आणि फलटण या तालुक्यांचा समावेश करून ही चळवळ मोठी केली.

**२.दुसरी पाणी परिषद (२६ जुलै १९९४)**

२६जुलै १९९४ रोजी सावळज या ठिकाणी महात्मा गांधी हायस्कूल क्रीडांगणात दुसरी पाणी परिषद घेतली गेली. या परिषदेमधून कार्यकर्त्यांना मा. आर. आर. पाटील साहेब आणि सांगोला तालुक्याचे आमदार मा. गणपतराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले.[४]

**३. १९९४ ते १९९८ चा काळ**

या कालावधीत क्रांतिवीर अण्णांनी दुष्काळग्रस्तांसाठी पाच पाणी परिषदा घेतल्या. त्यापैकी तीन पाणी परिषदा सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील १३ दुष्काळी तालुक्याच्या संयुक्त व्यापक परिषदा घेतल्या होत्या.[५] या परिषदेंना शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या परिषदांमधून लोकांची एकजूट दिसून आली. चळवळीला अधिक गती मिळाली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**४. पाचवी पाणी परिषद (२७जुलै १९९८ )**

२०जुलै १९९८ रोजी आटपाडी तालुक्यातील घरनिकी या ठिकाणी चौथी पाणी परिषद घेण्यात आली. आणि सत्तावीस जुलै १९९८ रोजी आटपाडी येथे पाचवी पाणी परिषद अशा भव्य परिषदा पाटोपाठ घेतल्या गेल्या.[६] ही परिषद भवानी हॉस्पिटलच्या मैदानावर ६०,००० शेतकरी कष्टकरी आणि दुष्काळग्रस्तांच्या साक्षीने पार पडली. या परिषदेमधून डॉ. भारत पाटणकरांनी ३१ मे २००० च्या भारत सरकारने कृष्णा खोऱ्याची कामे पूर्ण करावीत. यासाठी लागणारा निधी महाराष्ट्रातील कारखानदारावर विकास कर लागू करून उभा करावा. भूमीहीनासह सर्व दुष्काळी कुटुंबांना पाण्याचे समान वाटप करण्यात यावे असे ठराव मांडले गेले.या ठरावास आमदार गणपतराव देशमुख यांनी पाठिंबा दिला. तसेच मा. आर.आर पाटील साहेबांनी युती सरकारच्या निषेधाचा ठराव मांडला. त्यास सर्वांनी पाठिंबा दिला,याशिवाय परिषदेत ठरल्याप्रमाणे २९ ऑक्टोंबर १९९८ ला दुष्काळी भागातील प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदार कार्यालयावर शेतकऱ्यांचे मोर्चे काढण्यात आले.माढा तालुका तहसील कार्यालयासमोर क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी धरणे आंदोलन केले. सांगोला तहसीलदार कार्यालयासमोर गणपतराव देशमुख यांनी आंदोलन केले मंगळवेढा तहसील कार्यालयासमोर भारुड सादर करीत आमदार लक्ष्मणराव ढोबळे यांनी मोर्चा काढला. तसेच वडूज येथे अॅड.सुभाष देशमुख यांनी फलटण येथे माजी आमदार हरिभाऊ निंबाळकरांनी तहसील कार्यालयतील तहसीलदारांना घेराव घालून निवेदन दिले होते, तरी देखील सरकार अद्याप ढिम्मच होते.तथापि नागनाथ अण्णांनी निराश न होता लढा सुरूच ठेवला होता.त्यांनी २८ ऑगस्ट २००० रोजी दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांचा सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला. तसेच २२ नोव्हेंबर२००० रोजी कृष्णा खोरे योजनेचे पाणी दुष्काळी भागाला मिळावे या मागणीसाठी आटपाडी तालुक्यातील करगणी,झरे,दिघंची, आटपाडी आणि शेटफळे गावातील ५० हजाराहून अधिक लोकांनी एकत्र येऊन मानवी साखळी करून या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.[७] यात मोठ्या संख्येने स्त्री-पुरुष आणि विद्यार्थिनी सहभागी झाले होते.त्या दिवशी आटपाडी तालुक्याचा व्यवहार यशस्वीपणे बंद करून या चळवळीला अधिक गती दिली.

**५) आठवी पाणी परिषद (२८ जुलै २००१)**

१३ दुष्काळग्रस्त तालुक्यातील शेतकऱ्यांची २८ जुलै २००१ रोजी आटपाडी या ठिकाणी पाणी संघर्ष परिषद आयोजित केली होती.[८] ही परिषद कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित केली होती.कर्मवीरांच्या स्वातंत्र्य आणि समतेच्या तत्त्वानुसार दुष्काळी भागातील लोकांनी वाटचाल करावी आणि सरकार पुढे लाचार व हतबल न होता आपल्या न्याय हक्कासाठी झगडत राहावे असे जाहीरपणे सांगण्यात आले. नागनाथ अण्णांनी दुष्काळी भागात जोपर्यंत पाणी येत नाही तोपर्यंत शेतसारा न भरण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले होते.

**६) नववी पाणी परिषद (२६जुलै २००२ )**

२६ जुलै २००२ रोजी आटपाडी या ठिकाणी पाणी परिषदेचे आयोजन केले होते.या परिषदेचे उद्घाटन निळू फुले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षपदी माजी आमदार गणपतराव देशमुख हे होते.या परिषदेमधून कृष्णा खोरे प्रकल्पासाठी महाराष्ट्र सरकारने निधी उपलब्ध करून द्यावा, अन्यथा दुष्काळग्रस्त १३ तालुक्यातील २ लाख कार्यकर्ते २ऑक्टोंबर पासून तीव्र संघर्ष करण्याचा इशारा दिला .पण या आटपाडी पाणी परिषदेनंतरही कृष्णा खोरे महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे सरकारकडून आश्वासनाचा खेळ सुरू राहिला.आणि पाणी संघर्ष चळवळीच्या वतीने सरकारला निवेदन देणे,मोर्चे आणि परिषदांचे कार्यक्रम होतच राहिले.या लढ्याचा भाग म्हणून पाणी संघर्ष समितीने १९ जानेवारी २००४ रोजी पुणे येथे कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन केले. हे आंदोलन नागनाथ अण्णा,डॉ.बाबा आढाव, गणपतराव देशमुख,डॉ. भारत पाटणकर आणि हजारो शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली केले.[९] तात्काळ दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य सरकारचे गृहमंत्री आर.आर पाटील आणि पाटबंधारे मंत्री अजित पवार यांनी आंदोलन स्थळी भेट दिली आणि राज्य शासनामार्फत या कृष्णा खोरे सिंचन प्रकल्पासाठी १५०० कोटी रुपयांचा निधी ३१ मार्च २००४ रोजी पर्यंत उभारण्यास मंजुरी दिल्याचे जाहीर करून टाकले. तसेच या निधीपैकी ११५० कोटी रुपये कृष्णा खोऱ्यातील दुष्काळी भागातील प्रकल्पासाठी खर्च करण्याचे आणि महिनाभराच्या कालावधीत काम सुरू करण्याचे आश्वासन दिले.[१०] त्यानंतर दोन दिवसांनी हे ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.दरम्यान महिनाभराच्या काळात कामाचा शुभारंभ झाला.अशा प्रकारे सुरू असलेल्या ११ वर्षाच्या लढयाची यशस्वी सांगता झाली.

**७) सतरावी पाणी परिषद ( २६ जुलै २००९ )**

ही सतरावी पाणी परिषद दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी,कष्टकरी आणि युवकांनी यशस्वी केली.या परिषदेत क्रांतिवीर नागनाथ अण्णा,गणपतराव देशमुख, डॉ.भारत पाटणकर आणि आमदार शरद पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.या परिषदेतून अण्णांनी लोकांना पाणी मिळेपर्यंत कष्ट करण्याचा मनोदय व्यक्त केला. त्यासाठी पाणी संघर्ष लढा तीव्र करण्याची गरज व्यक्त केली.पाणी संघर्ष लढयामुळे टेंभू योजनेला गती मिळाली.या चळवळीचे नेतृत्व करणारे पद्मभूषण क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे २२ मार्च २०१२ रोजी वाळवा या ठिकाणी दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने या चळवळीचे नेतृत्व हरपले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**८) एकविसावी पाणी परिषद (२६ जून २०१३ )**

२६ जून २०१३ रोजी आटपाडी या ठिकाणी २१ वी पाणी परिषद झाली.या परिषदेत अण्णांचे पुत्र वैभव काका नायकवडी हे सहभागी झाले.या परिषदेत काही महत्त्वाचे ठराव पास करण्यात आले.यामध्ये टेंभू,उरमुडी, नीरा,देवधर योजनांचा केंद्र सरकारच्या योजना समावेशकरून निधी तातडीने मिळावा. राज्य सरकारने अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी टेंभू आणि म्हैसाळ साठी प्रत्येकी १५.२ कोटीचा निधी तात्काळ देऊन कामाला गती देण्यात यावी. नियोजनाप्रमाणे टेंभू आणि म्हैसाळची कामे पूर्ण न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला. टेंभू प्रकल्पाला क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे नाव देण्यात यावे.[११] अशा प्रकारे या परिषदेला बाळासाहेब नायकवडी प्रा.दादासाहेब ढेरे, शिवाजी काळुंगे,चंद्रकांत देशमुख, बाळासो बागवान, सावंता पुसावळे, हणमंतराव देशमुख,डॉ.बाबुराव गुरव आणि शरद पाटील इत्यादींनी मार्गदर्शन केले. मात्र या आटपाडी पाणी परिषदेत नागनाथ अण्णांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या डॉ.भारत पाटणकर या परिषदेला गैरहजर राहिले आणि तेव्हापासून त्यांनी पाणी परिषदेची आपली वेगळी स्वतंत्र चळवळ सुरू केली.

**९. आटपाडी पाणी परिषदेतील मागण्याचे परिक्षण (११जुलै १९९३ ते २६ जून २०१५)**

आटपाडी पाणी परिषदेच्या ११जुलै १९९३ ते २६ जून २०१५ पर्यंत एकूण २३ पाणी परिषदा समितीने आयोजित केला होत्या. या २३ वर्षाच्या कालखंडातील आटपाडी पाणी परिस्थितीतील मागण्या पुढील प्रमाणे असलेल्या दिसून येतात.

- पाणी ही सार्वजनिक मालमत्ता समजून सरकार जनतेच्या नियंत्रणात ठेवावे.
- टेंभू ताकारी म्हैसाळ, धोम-बलकवाडी नीरा देवधर आणि उजनी इत्यादी पाणी प्रकल्पाच्या कामासाठी सरकारने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा.
- आटपाडी भागातील कृष्णा खोऱ्यातील पाण्याचे विषम वाटप बदलून त्या ऐवजी समान पाणी वाटपाच्या आधारावर फेर आखणी करावी.तसेच 13 दुष्काळग्रस्त तालुक्यातील पाण्याचे समान वाटपाच्या आधारावर आखणी करावी.
- दुष्काळग्रस्त भागातील सर्व कुटुंबांना पाण्याचा समान वाटा मिळाला पाहिजे.
- टेंभू योजनेला क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे नाव देण्याचे आग्रह धरला.
- टेंभू योजनेचा केंद्र सरकारच्या ए.आय.बी.पी योजनेत समावेश करावा आणि केंद्राची तातडीने मदत मिळवण्यासाठी आग्रह होता.

**समारोप –**

आटपाडी पाणी परिषदेमुळे टेंभू,म्हैसाळ, ताकारी योजनेच्या कामाला गती मिळाली. पाणी परिषदेमुळे पाणी टंचाई,जलसंधारण,पाणी व्यवस्थापन आणि जल प्रदूषण यासारख्या समस्यांबद्दल जनजागृती झाली. पाणी परिषदेत शेतकरी ,जलतज्ज्ञ, सरकार आणि इतर संबंधित पक्ष यांच्यात चर्चा झाल्या. पाणी समस्यांचे निराकरण करण्यासाठी नवीन मार्ग शोधण्याचा प्रयत्न झाला. पाणी परिषदेमुळे शासनाचे लक्ष पाणी समस्यांकडे वेधले गेले. पाणीपुरवठा योजनांना गती मिळाली. पाणी परिषदेमुळे पाणी संघर्ष चळवळीला बळ मिळाले. पाणी परिषदेच्या संघर्षामुळे १३ दुष्काळग्रस्त तालुक्यात पाणी पोहोचले. शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यामुळे या दुष्काळी भागातील शेती आणि पीक पद्धतीमध्ये मोठा बदल झाला.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

1. पारेकर(डॉ.)नंदा,महाराष्ट्राचे शिल्पकार: क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी,प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथमावृत्ती २०१८,पृ. ७४
2. मुलाखत - डॉ.भारत पाटणकर दि -३० नोव्हेंबर२०२२
3. पारेकर (डॉ.) नंदा, उपरोक्त पृ. ७४
4. धर्माधिकारी भालचंद्र विष्णुपंत, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी गौरव समिती,वाळवे,प्रथमाआवृत्ती १५ जुलै १९०७ पृ. १५०
5. कित्ता,पृ. १५२
6. पारेकर (डॉ.) नंदा उपरोक्त पृ.७५
7. कित्ता, पृ. ७५
8. धर्माधिकारी भालचंद्र विष्णुपंत,उपरोक्त पृ.१५७
9. पारेकर (डॉ.) नंदा,उपरोक्त पृ. ७६
10. कित्ता पृ. ७७,७८
11. दैनिक पुढारी सांगली आवृत्ती, दि - २७ जून २०१३ पृ.४